# जाहीर नोटीस

## प्रमुख जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,......

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील अभिलेख कक्ष व झेरॉक्स रुम येथील शार्प कंपनीचे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन करिता आवश्यक असलेले टोनर नग–४ खरेदी करणेचे आहेत.

तरी ज्या कोणाला वर नमुद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील अभिलेख कक्ष व झेरॉक्स रुम येथे असलेले शार्प कंपनीचे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन करिता आवश्यक असलेले टोनर नग–४ उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून आठ दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ३०/०१/२०२५ पर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

1- दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुची किंमत इत्यादीबाबी स्वतंत्र नमुद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

2- सदर लखोटयावर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी येथे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन करिता टोनर नग– ४ खरेदी बाबतचे दरपत्रक असे नमुद असावे.

3- जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

4- सर्वात कमीत कमी दराने दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

5- पुरविणेत येणारे टोनर नग–४ हे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदरचे पुरविणेत आलेले टोनर खराब निघाल्यास ते पुन्हा नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. २३/०१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
सत्यमेव जयते
डीस्ट्रीक्ट कोर्ट, रत्नागिरी

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

दिनांक– २३/०१/२०२५

म.जा.क्र. वित्त/५२४/२०२५
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक– २३/०१/२०२५

**<u>प्रत नोटीसबोर्डातर व वेबसाईटवर प्रसिध्दीकरिता</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
2- जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे